नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १४३ Issue - 143 | वार शनिवार दि. ११ ऑक्टोबर २०२५ Blow- Saturday Date 11 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ३४७ तालुक्यातील पूरग्रस्तांसाठी आणखी सवलती


## दहावी अन् बारावीची परीक्षा फी देखील होणार माफ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पूरग्रस्त आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारनं ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचं पॅकेज जाहीर केलं आहे. या पॅकेज संदर्भातील जीआर सरकारने काल जाहीर केला होता. यामध्ये राज्यातील २९ जिल्ह्यातील २५३ तालुक्यांचे नुकसान झाल्याचं सांगण्यात आलं आहे. यामध्ये काही जिल्हे वगळले होते. मात्र, मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी आ-वाज उठवल्यांतर सरकारनं आज पुन्हा नवीन जीआर काढला आहे. यामध्ये सरकारनं राज्यातील ३४ जिल्ह्यातील ३४७ तालुक्यांचे नुकसान झाल्याचे सांगितले आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी आणि १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी करण्याचा निर्णय सरकारनं या नवीन जीआरमध्ये घेतला आहे.

राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये ३४७ तालुक्यातील शेती पिकांचे, शेतजमिनीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच जनावरे दगावणे, मनुष्य हानी होणे, घराची पडझड होणे यासाठी सरकारनं मदतीचा नवीन जीआर जाहीर केला आहे. राज्य सरकारनं जाहीर केलेल्या जीआरमध्ये दिलेल्या माहितीनुसार, जून ते ऑगस्ट या तीन महिन्यात राज्यातीस २६.६९ लाख हेक्टर क्षेत्र आणि सप्टेंबरमध्ये ३९ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. म्हणजे एकूण ६५ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचं नुकसान झालं आहे. नवीन जीआरनुसार नेमक्या काय मिळणार सवलती? १) जमिन महसुलात सूट २) सहकारी कर्जाचे पुनर्गठन ३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीसाठी





स्थगिती (एक वर्षासाठी) ४) तिमाही वीज बिलात माफ ५)परीक्षा शुल्कात माफी व १० वी १२ वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी

# सरकारने ओबीसीतील घुसखोरी थांबवावी, अन्यथा सरकारला थांबवू





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण मिळत असेल तर आमचा विरोध नाही, कोणत्याही परिस्थितीत हा रद्द व्हावा अशी आमची मागणी आहे. हा मोर्चा फक्त झाकी आहे, काहीही झालं तरी ओबीसीमधील घुसखोरी थांबवू, सरकार थांबवत नसेल तर सरकारला थांबवू, असा इशाराही वडेट्टीवारांनी महायुती सरकारला दिला. धनगर समाजात फूट पाडली, ओबीसीमध्ये फूट पाडली, ही पाळी आज आपल्यावर आणली. आरक्षण नको हीच ह्यांची विचारधारा आहे, असेही वडेट्टीवार यांनी म्हटले.

राज्यातील मराठा-ओबीसी आर-क्षणातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आज ओबीसी नेत्यांच्या नेतृत्वात नागपूर येथे मोठा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चातून ओबीसी समाजाने सरकारला इशारा दिला असून २ सप्टेंबर रोजी काढण्यात आलेला शासन निर्णय रद्द करावा, अशी प्रमुख मागणी मोर्चेकरांची आहे. ओबीसी नेते विजय वडेट्टीवार यांनीही मोर्चातील भाषणातून सरकारला इशारा दिला आहे. येथे

### ओबीसी मोर्चातून विजय वडेट्टीवारांचा सरकारला इशारा, जरांगेंनाही टोला

ओबीसींच्या आजच्या ऐतिहासिक मोर्चा मध्ये ३७१ जाती आहेत, आणि दुसरीकडे मराठा एक जात आहे. जे ५६ टक्के त्यांना २७ आरक्षण आणि १५ टक्के लोकांना ४८ टक्के आरक्षण ही चाणक्यनिती आहे. राज्यातील १५ टक्क्याचं सरकार हे तुमच्यात भांडण लावण्याचं काम करत आहे. २ सप्टेंबर रोजी काढलेला जीआर वाचल्यावर एका जरांगेच्या भरवश्यावर तुम्ही निवडून आलात काय? असा सवाल वडेट्टीवार यांनी विचारला. आमदारकी गेली खड्ड्यात वड्डेटीवार कसलीही परवा करणार नाही. राजकारणापलिकडे जाऊन जो कोणी आपला घात करेल, त्याचा घात करण्याची तयारी ठेवा. सरकारने २ सप्टेंबरचा जीआर रद्द न केल्यास पुणे-मुंबई जाम करू, असा इशाराही सरकारला दिला. माझा डीएनए ओबीसी आहे, तुमचा ओबीसी असेल तर ओबीसींच्या गळ्यावर सुरी का फिरवत आहात. सुधारून जा नाहीतर तुमची जागा दाखवणार, असा इशाराच सरकारला दिला आहे. आमदारकी खड्ड्यात गेली, आमच्यावर अन्याय होत असेल तर वड्डेटीवार कसली परवा करणार नाही. सरकारने २ सप्टेंबरचा जीआर रद्द न केल्यास त्यांनी केवळ मुंबईत मोर्चा काढला, आम्ही मुंबई पुण्यासह ठाणेही जाम करू, असा इशाराही विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील महायुती सरकारला दिला आहे. केंद्राच्या आर्थिक निकषावरील म्हणजेच एथड आरक्षणामध्ये १० टक्के आरक्षण आहे, त्यापैकी साडे आठ टक्के आरक्षणाचा फायदा मराठा समाजाला मिळतो आहे. या बैताड जरांगेला हे कळत नाही. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मी त्यांना भेटायला गेलो, आता माझा व्हिडिओ व्हायरल केले जात आहेत. ४ हजार ३०० नोंदी असणाऱ्या बांधवांना आरक्षण द्यावे ही आमची भूमिका होती. परंतु, २ लाख ४० प्रमाणपत्र वाटल्या गेली आहेत, आज संपूर्ण मराठा समाज ओबीसीमध्ये आला आहे. मराठा समाज आला तर उपवर्गीकरण करण्याचे काम सरकार करेल. सरकारने याच्यापुढे नातेवाईकांना प्रमाणपत्र दिले तरी ते ओबीसी मध्ये पात्र होणार आ-हेत. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री ओबीसीच्या हातात घंटा देणार, मग तुम्हाला घंटा वाजायचे काम राहील, असे वडेट्टीवार यांनी आपल्या भाषणात म्हटले.

# एका पराभवातून खचणारा नाही : उद्धव ठाकरे

मुंबई : बेस्ट कर्मचाऱ्यांच्या क्रेडिट सोसायटी निवडणुकीत पराभवानंतर आज शिवसेना (उद्धव ठाकरे गट) कडून नवीन कार्यकारिणीचा मेळावा पार पडला. या मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी बेस्ट पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत त्यांना मार्गदर्शन केलं.या वेळी उद्धव ठाकरे म्हणाले, निवडणुकीत पराभव झाला म्हणून खचून जायचं नाही. पराभव हा कायमस्वरूपी नसतो. पुढच्या वेळेस आपण अधिक जोमाने, ताकदीने निवडणुकीच्या मैदानात उतरू आणि विजय मिळवू.

ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना बेस्टशी संबंधित प्रश्न, कर्मचारी आणि प्रवाशांच्या अडचणी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याचं आवाहन केलं. समस्या सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत रहाणं आणि नागरिकांच्या हितासाठी आवाज उठवत रहाणं गरजेचं असल्याचं त्यांनी सांगितलं. या बैठकीत बेस्टच्या कामकाजात सुधारणा, सेवा गुणवत्ता आणि कर्मचारी वर्गाच्या मागण्यांवरही सविस्तर चर्चा झाली.

तुमची काम करण्याची जिद्द आणि निष्ठा महत्वाची फार महत्त्वाचं असतं. शिवसेनेनं यापूर्वी कमी वादळं आणि कमी संकटं पाहिली नाहीत असं नाही. शिवसेनेनं पाहिलेल्या वादळांना आणि संकटांना शिवसैनिक म्हणून तुम्ही उतर दिल आहे. बेस्ट कामगार सेनेचं काय होईल याची चिंता नाही पण बेस्टच काय होईल याची काळजी आहे. आपलं सरकार असतं बेस्टला वैभवापर्यंत नेलं असतं. गद्दारी झाली त्यांच्या निष्ठा कोणाच्या पायी आहेत हे सर्वांना कळलं आहे. कागदावर सत्ता कोणाची असली तरी वट ही शिवसेनेची असते हे तुम्ही दाखवलं आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

उद्धव ठाकरे पुढं म्हणाले, काल परवा झालेला पराभव याची कारण काहीही असतील,एका पराभवातून खचणारा मी नाहीये, पराभवाचं पुन्हा विजयात रुपांतर करण्याची जिद्द तुमच्यामुळं माझ्यात आहे. निष्ठूरपणानं बळकावण्याचं काम सुरु झालं आहे. पंतप्रधान आपला, मुख्यमंत्री आपला पाहिजे, महापौर आपला पाहिजे, बेस्टमध्ये ड्रायव्हर आपला पाहिजे. घ्यायचं असेल तर न्यायपद्धतीनं घ्या, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं.

मत चोरीचा प्रकार उघडकीस आलेला आहे,बोगस मतदान करायचं आणि आम्हाला जनतेचा आशीर्वाद आहे, असं मिरवायचं. याला लोकशाही म्हणत नाहीत, त्याला चोरशाही म्हणतात. मला चिंता आहे मुंबईवरचा मराठी ठसा याची, असंही ठाकरेंनी म्हटलं. कदाचित बेस्ट अदानीच्या हातात देतील, एअरपोर्ट दिलं, मोनो अनिल अंबानीकडे दिलंय. बेस्ट ही माझ्या शहराची रक्त वाहिनी आहे. एसटी राज्याची रक्तवाहिनी आहे.प्रत्येकाच्या घराजवळ जाणारी बेस्ट आहे. मी स्वत: बेस्टनं प्रवास केलेला आहे, असं उद्धव ठाकरे यांनी सांगितलं.

मी स्वतः बेस्टने प्रवास करणारा आहे शाळेत असताना कॉलेजला जाताना प्रवास केला आहे, तुंबलेल्या पाण्यातून बेस्ट कशी काढली हे मी पाहिली आहे.मी मुख्यमंत्री असताना दोन तीन डेपोच नुतनीकरण केलं होतं. कर्मचारी माणसं आहेत, त्यांना त्यांचा अधिकार मिळाला पाहिजे म्हणून आपली बेस्ट कामगार सेना आहे.आता चांगलं काम केलंत, पगार दिला बोनस देण्याची परिस्थिती आहे की नाही माहिती नाही, सरकार यांचं आहे पण लोकांना द्यायला पैसा नाही,न्याय हक्काची लढाई करणारा माणूस हा बेस्ट कामगार सेनेचा आहे म्हणून मला बेस्ट कामगार सेना महत्वाची वाटते.तीन नवे दिलेत म्हणजे जुने काढले नाहीत. काही ठिकाणी बदल करावे लागतात. बदल केले म्हणजे संघटना वाढणारच आहे, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं.

# मिरजमध्ये हवालदाराच्या चहाच्या दुकानात छापल्या एक कोटींच्या नोटा

मिरज (जि. सांगली): मिरज शहरात पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल एक कोटी रुपयांच्या बनावट नोटा जप्त केल्या असून, या प्रकरणात कोल्हापूर पोलिस दलातील एका हवालदारासह पाच जणांना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून ५०० आणि २०० रुपयांच्या बनावट नोटा, कलर झेरॉक्स मशीन, स्कॅनर-प्रिंटर आणि एक वाहन असा एकूण १ कोटी ११ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला असल्याची माहिती पोलिस अधीक्षक संदीप घुगे यांनी दिली.

पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे की या बनावट नोटांची छपाई कोल्हापूर शहरातील पोलिस हवालदाराच्या चहाच्या दुकानात केली जात होती. हे दुकानच नोटा तयार करण्याचे अड्डे म्हणून वापरले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात पोलिसांनी अटक



केलेल्या सर्व आरोपींकडून चौकशी सुरू असून, या बनावट नोटा कोठे कोठे फिरवल्या गेल्या आणि या टोळीचा अजून कोणाशी संबंध आहे का, याचा तपास सुरू आहे. या कारवाईमुळे कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील गुन्हेगारी वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, पोलिस दलातीलच एका कर्मचाऱ्याचा यात सहभाग उघड झाल्याने या प्रकरणाची चर्चा होताना दिसत आहे. पाचशे रुपयांच्या खऱ्या नोटेच्या बदल्यात तीन बनावट नोटा देण्यात येत होत्या. प्रकरण उघडकीस आणणाऱ्या पोलिसांना पारितोषिक देण्यात येणार असल्याचे पोलिस अधीक्षक घुगे यांनी सांगितले आहे.

**पहिल्या टप्प्यात ६ अन् दुसऱ्या टप्प्यात ६ सिडसा केंद्रे सुरू करण्यात येणार**

**कृषी विभाग आणि आय व्हल्यू संस्थेमध्ये करार**

# राज्यात १२ ‘सिडसा’ केंद्रे स्थापन करण्यास मंजुरी : कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे (जिमाका) : राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ मिळावा, संशोधन प्रत्यक्ष शेतापर्यंत पोहोचावे आणि तरुणांना कृषी क्षेत्रात करिअरची संधी मिळावी, या उद्देशाने राज्यातील ४ कृषी विद्यापीठांत कृषी नवोन्मेष व विकासासाठी प्रत्येकी ३ याप्रमाणे एकूण १२ ‘सेंटर फॉर इनोव्हेशन अँड डेव्हलपमेंट इन स्मार्ट ग्रीकल्चर’ (सिडसा) सुरु करण्यास मंजुरी देण्यात आल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

पहिल्या टप्प्यात ६ आणि दुसऱ्या टप्प्यात उर्वरित ६ सिडसा केंद्रे सुरू करण्यात येणार असून याबाबत कृषी विभाग आणि आय व्हल्यू संस्थेमध्ये करार करण्यात येणार आहे, असेही ते म्हणाले.

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद कार्यालय येथे कृषी विद्यापीठाअंतर्गत ‘सीडसा’ स्थापन करण्याबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, महासंचालक वर्षा लड्डा-उंटवाल, उपसचिव प्रतिभा पाटील, श्रीकांत आंडगे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख आणि महाराष्ट्र कृषी शिक्षण



व संशोधन परिषदेचे सदस्य सदस्य प्रवीण देशमुख, विनायक काशिद, मोरेश्वर वानखेडे, जनार्धन कातकडे प्रत्यक्ष बैठकीत तर डॉ. विवेक दामले (दूरदृश्यप्रणालीद्वारे)उपस्थित होते.

कृषिमंत्री भरणे म्हणाले, ‘सिडसा’ केंद्रामार्फत राज्यातील कृषी शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञान विकास अधिक परिणामकारकपणे राबविण्यात येईल. या निर्णयामुळे राज्यातील कृषी शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञानाचा प्रसार गतिमान होणार असून, महाराष्ट्र स्मार्ट शेती आणि कृषी नवकल्पनांचा राष्ट्रीय केंद्रबिंदू बनेल आणि ग्रामीण युवांसाठी ग्री-टेक स्टार्टअप्स आणि इनोव्हेशन इकोसिस्टम तयार होईल. हे केंद्र स्मार्ट शेतीकडे वाटचाल करणारा महाराष्ट्राचा पाया ठरणार आहे.

विद्यापीठांच्या माध्यमातून तयार होणारे नवे प्रयोग थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतील आणि कृषी क्षेत्रातील उत्पादकता, कार्यक्षमता आणि नफा वाढेल. या केंद्रांच्या स्थापनेसाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही गतीने पूर्ण करावी तसेच प्रत्येक केंद्र ‘शेतकऱ्याच्या शेतात संशोधन’ या तत्वावर काम करेल याची खात्री करण्याचे त्यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

सिडसा विषयी माहिती:

‘सिडसा’ ही एक प्रगत संकल्पना असून कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान, संशोधन, डेटा विश्लेषण आणि स्मार्ट शेती उपाय विकसित करून ते थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश आहे. कृषी शिक्षण व उद्योग यांच्यातील दरी कमी करणे, शेतीतील समस्यांवर तंत्रज्ञान आधारित उपाय शोधणे, राज्यातील कृषी डेटा बँक आणि स्मार्ट शेती मॉडेल्स विकसित करणे, ग्रामीण युवांसाठी ॲग्री-टेक स्टार्टअप्स आणि इनोव्हेशन परिसंस्था तयार करणे आणि जागतिक स्तरावर महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राची प्रतिस्पर्धात्मकता वाढवण्यासाठी ही केंद्रे महत्त्वाची ठरणार आहेत.

या केंद्रात कृषी ऑटोमेशन लॅब-एए, स्मार्ट प्रिसिजन ग्रीकल्चर लॅब, एआर, व्हीआर सर्व्हिसेस लॅबसह कृषी तंत्रज्ञान सोल्यूशन्स, कृषी उपकरणे इनोव्हेशन लॅब, शेतीसाठी प्रगत ड्रोन तंत्रज्ञान आणि जिओस्पेशिअल फार्मिंग सोल्युशन्स लॅब अशा विविध लॅब्स तयार होणार आहे. आयओटी, ड्रोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, रिमोट सेंसिंग, डेटा नालिटिक्स अशा तंत्रांचा उपयोग करून स्मार्ट शेती विकसित करण्यावर भर देण्यात येणार आह. कृषी विद्यापीठे, उद्योग, स्टार्टअप्स आणि शेतकरी यांच्यात समन्वयाचे व्यासपीठ निर्माण होईल.

## संपादकीय....

### ‘सिडसा’ची मंजुरी

राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ मिळावा, संशोधन प्रत्यक्ष शेतापर्यंत पोहोचावे आणि तरुणांना कृषी क्षेत्रात करिअरची संधी मिळावी, या उद्देशाने राज्यातील ४ कृषी विद्यापीठांत कृषी नवोन्मेष व विकासासाठी प्रत्येकी ३ याप्रमाणे एकूण १२ ‘सेंटर फॉर इनोव्हेशन अँड डेव्हलपमेंट इन स्मार्ट ग्रीकल्चर’ (सिडसा) सुरु करण्यास मंजुरी देण्यात आल्याची माहिती नुकतीच कृषिमंत्र्यांनी दिली. पहिल्या टप्प्यात ६ आणि दुसऱ्या टप्प्यात उर्वरित ६ सिडसा केंद्रे सुरू करण्यात येणार असून याबाबत कृषी विभाग आणि आय व्हल्यू संस्थेमध्ये करार करण्यात येणार आहे. महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद कार्यालय येथे कृषी विद्यापीठाअंतर्गत ‘सीडसा’ स्थापन करण्याबाबत आयोजित बैठकीत त्यांनी माहिती दिली. ‘सिडसा’ केंद्रामार्फत राज्यातील कृषी शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञान विकास अधिक परिणामकारकपणे राबविण्यात येईल. या निर्णयामुळे राज्यातील कृषी शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञानाचा प्रसार गतिमान होणार असून, महाराष्ट्र स्मार्ट शेती आणि कृषी नवकल्पनांचा राष्ट्रीय केंद्रबिंदू बनेल आणि ग्रामीण युवांसाठी ग्री-टेक स्टार्टअप्स आणि इनोव्हेशन इकोसिस्टम तयार होईल. हे केंद्र स्मार्ट शेतीकडे वाटचाल करणारा महाराष्ट्राचा पाया ठरणार आहे. विद्यापीठांच्या माध्यमातून तयार होणारे नवे प्रयोग थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतील आणि कृषी क्षेत्रातील उत्पादकता, कार्यक्षमता आणि नफा वाढेल. या केंद्रांच्या स्थापनेसाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही गतीने पूर्ण करावी तसेच प्रत्येक केंद्र ‘शेतकऱ्याच्या शेतात संशोधन’ या तत्वावर काम करेल याची खात्री करण्याचे त्यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

# स्पष्ट दृष्टिकोन, जलद निर्णय आणि जबाबदार अंमलबजावणी महाराष्ट्राच्या विकासाचे तीन स्तंभ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याच्या सर्व प्रकल्पांच्या अंमलबजावणीत स्पष्ट दृष्टिकोन, जलद निर्णयप्रक्रिया आणि जबाबदार अंमलबजावणी हे तीन महत्त्वपूर्ण स्तंभ आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. जिओ वर्ल्ड सेंटर येथे आयोजित ग्लोबल फिनटेक फ स्ट २०२५ च्या कार्यक्रमामध्ये क्रेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत घेतली, त्यावेळी ते बोलत होते.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई ट्रान्स हार्बर लिंकसारखे विविध प्रकल्प अनेक दशके प्रलंबित होते, परंतू ‘इन्फ्रास्ट्रक्चर वॉर रूम’च्या माध्यमातून निर्णयप्रक्रिया गतिमान करण्यात आली. पूर्वी मुंबई मेट्रोच्या पहिल्या टप्प्याला केवळ नियोजनासाठी सहा वर्षे लागली होती. मात्र आम्ही ३७२ किमी मेट्रो नेटवर्कसाठी केवळ ११ महिन्यांत निविदा टप्प्यापर्यंत पोहोचलो.

सन २०३० पर्यंत महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्याचे आमचे ध्येय आहे. त्यासाठी ‘एमएमआर ग्रोथ हब इनिशिएटिव्ह’च्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशाला १.५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्याचे उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

नवी मुंबई परिसरात ‘तिसरी मुंबई’ची उभारणी करण्यात येणार असून त्यात ‘एज्यु सिटी’, ‘इनोव्हेशन सिटी’, ‘स्पोर्ट्स सिटी’ आणि ‘जीसीसी सिटी’ उभारण्यात येणार आहे. ‘एज्यु सिटी’त १० ते १२ परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस येणार असून १ लाख विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळेल. या विद्यापीठांमध्ये जागतिक दर्जाच्या संस्था असणार आहेत. यामुळे नव्या शहराचा आणि नव्या अर्थव्यवस्थेचा विकास होणार असल्याचे ते म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, इनोव्हेशन सिटीमध्ये जागतिक स्तरावरील संशोधन व तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यासाठी पुढाकार घेतला असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुंबईच्या उत्तरेकडील भागात वाढवण येथे भारतातील सर्वात मोठा बंदर प्रकल्प उभारला जात आहे. २० मीटर खोल ड्राफ्ट असलेले हे बंदर जगातील पहिल्या दहा बंदरांमध्ये गणले जाणार आहे. याशिवाय, ऑफशोर विमानतळ आणि बुलेट ट्रेन स्टेशनही प्रस्तावित आहे. या प्रकल्पांमुळे मुंबई नवीन आर्थिक केंद्र म्हणून उदयास येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तंत्रज्ञानाच्या वापराबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान राज्यातील सर्व क्षेत्रांमध्ये परिवर्तन घडवत आहे. राज्य सरकारने शेती क्षेत्रासाठी ५०० कोटी रुपयांचे ‘ख मिशन’ हाती घेतले असून, शेतकऱ्यांसाठी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत एआय चॅटबॉट विकसित करण्यात आले आहे. हवामान बदलामुळे शेतीवर होणाऱ्या परिणामांना तोंड देण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करून शाश्वत शेतीचा नवा मार्ग शोधला जात आहे. या कार्यक्रमामध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी नवउद्योग, संशोधक आणि स्टार्टअप कंपन्यांना महाराष्ट्र शासनासोबत सहकार्य करण्याचे आणि सहभागी होण्याचे आवाहन केले.

## स्वयंसेवक व्हा आणि सेवा करा : बंडुकाका दहातोंडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्रातील सर्व देवस्थानां मध्ये निशुल्क सेवा देणारी संस्था म्हणून नावलौकिक प्राप्त झालेल्या शनीसेवा सोशल फाउंडेशन माध्यमातून कोजागिरी पौर्णिमा निमित्ताने अहिल्यानगर जिल्ह्यातील मोहटा देवी येथे आलेल्या भाविकांसाठी सेवा करण्याची संधी मिळाली या प्रसंगी फाउंडेशन चे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष बंडुकाका दहातोंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. फाउंडेशन च्या माध्यमातून आतापर्यंत जिल्ह्यातील श्रीक्षेत्र देवगड, काळभैरवनाथ आगडगांव, पंढरपूर, मायंबा देवस्थान सावरगाव, तसेच प्रत्येक अमावस्येला चैतन्य कानिफनाथ मंदिरामध्ये विनामुल्य सेवा देत असुन.फाउंडेशन च्या वतीने सामाजिक कार्य देखील केले जाते. आषाढी एकादशीच्या दिंडी सोहळ्यात पायी जाणाऱ्या भाविकांना दरवर्षी डॉ सुधाकर निकाळजे व वृषभ गांधी, निरज मनोचा हे मोफत वैद्यकीय सेवा देत असतात. फाउंडेशन च्या माध्यमातून लवकरच उत्कृष्ट व्यक्तीमत्व उत्कृष्ट विद्यार्थी हे पुरस्कार देण्यात येणार असून मोहटा देवी येथे सेवेसाठी फाउंडेशन चे जेष्ठ मार्गदर्शक तथा सल्लागार बाळासाहेब वर्मा अशोक हराळे महाराष्ट्र राज्य सचिव शिवाजी दहातोंडे महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख डॉ सुधाकर निकाळजे, शशिकांत कर्डिले, शिवाजी शेळके, विठ्ठलराजे दहातोंडे, संजय वैरागर, कैलास केंकाण, संभाजी गवळी आणि महिला जिल्हाध्यक्षा प्राथमिक शिक्षका शांता मरकड-दहातोंडे, अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणी सदस्य संगीता निंबाळकर, मनिषा बोरुडे, ताराबाई जावळे, रंजना बोरुडे , रंजना नवले, सीता दहातोंडे, अर्चना दहातोंडे, लता बोरुडे, मुक्ता घनवट आदी सहभागी होते.

### शनी सेवा फौंडेशनच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम

हि निशुल्क सेवा करत असताना जे मानसिक समाधान मिळते... ते कुठेच मिळत नाही, डिसेंबर महिन्यात मोहटा देवी येथे देवी भागवत होणार असून त्या भाविकांची सेवा करायची संधी शनीसेवा सोशल फाउंडेशन ला मिळणार आहे व लवकरच तिरुपती बालाजी येथे तीन दिवस सेवा करण्यासाठी आपल्या फाऊंडेशन चे सदस्य जाणार आहेत, शनीसेवा सोशल फाउंडेशन मधे सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातून तसेच प्रत्येक तालुक्यातून भरपूर स्वयंसेवक इच्छुक आहेत असे संस्थापक अध्यक्ष कमलेश शेवाळे (देवा) यांनी सांगितले आहे. तरी सदस्य होण्यासाठी ९८५०२१२२४४ या क्रमांकावर संपर्क करावा.असे आहवान शनिसेवा फौंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे,

## भिवंडी तालुक्यात ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन व भव्य धम्म मेळाव्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भारतीय बौद्ध महासभेच्या भिवंडी शाखेच्या वतीने ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन व भव्य धम्म मेळाव्याचे आयोजन रविवार दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी भिवंडी तालुक्यातील कुणाल फार्म हाऊस, कवाड येथे आयोजित करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमांचे प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू , भारतीय बौध्द महासभेचे ट्रस्टी कार्याध्यक्ष, समता सैनिक दल राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर उपस्थित राहणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरला ५ लाख अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेत धम्मचक्र प्रवर्तनाचा ऐतिहासिक दिवस घडवून आणला होता. समानता, बंधुत्व आणि प्रबोधनाचा संदेश देणारा हा दिवस प्रेरणादायी ठरतो. याच अनुषंगाने , प्रबोधन व्हावे व धम्मकार्य अधिक गतिमान करण्यासाठी सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे भिवंडी तालुका अध्यक्ष रोहित जाधव यांची असून सदर कार्यक्रमासाठी सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन भारतीय बौद्ध महासभेच्या भिवंडी तालुका शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

## स्व.आमदार भाई गणपतरावजी देशमुख यांच्या घरावर झालेल्या भ्याड हल्याच्या निषेधार्थ उद्या सांगोला बंद ची हाक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : शहरात आज पक्ष प्रवेशाच्या रॅली दरम्यान सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते स्व.गणपरावजी देशमुख यांच्या घरावर अज्ञात व्यक्तिकडून भ्याड हल्ला करण्यात आला. या अज्ञात हल्लेखोरावर त्वरित कारवाई करावी या मागणी साठी आज शेतकरी कामगार पक्षाकडून तहसीलदार संतोष कणसे साहेब व सांगोला पोलिस स्टेशन चे काशीद साहेब यांना निवेदन देण्यात आले व हल्लेखोरांवर त्वरित कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. या हल्ल्याचा सांगोला शहर व तालुक्यातील सुज्ञ जनतेकडून तीव्र निषेध करण्यात आला असून उद्या शनिवारी सांगोला बंद ची हाक देण्यात आलेली आहे.



## जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था नि. क्र.०१ सोलापूरच्या चेअरमनपदी शतावरी एकनाथ राऊत यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पतसंस्थेच्या इतिहासात प्रथमच माळशिरस तालुक्याला चेअरमनपद मिळालेले असून सदरची बाब ही नक्कीच अभिमानास्पद आहे या निवडीबद्दल नूतन चेअरमन मा श्री शेतांबरी एकनाथ राऊत मॅडम यांचे महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ तालुका शाखा माळशिरस यांच्या मार्फत यथोचित सत्कार/सन्मान करण्यात आला.

यावेळी महासंघाचे माळशिरस तालुका अध्यक्ष तथा माळशिरस तालुका जिल्हा परिषद सेवकांच्या सहकारी पतसंस्थेची संचालक श्री धन्यकुमार अशोक काळे, तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते यावेळी कर्मचारी महासंघाकडून नूतन चेअरमन यांची अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा ही देण्यात आल्या.

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ‘प्रधानमंत्री धन-धान्य कृषी’ योजनेचा शनिवारी शुभारंभ : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेबाबत केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये घोषणा करण्यात आली होती. या योजनेचा शुभारंभ ११ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी साडेदहा वाजता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भारतरत्न सी. सुब्रमण्यम सभागृह, पुसा, नवी दिल्ली येथे होणार आहे. महाराष्ट्र राज्यस्तरीय कार्यक्रम कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सभागृह पुणे या ठिकाणी होणार आहे. कृषी क्षेत्रात प्रयोगशील व प्रगतिशील कामगिरी करणारे ३०० हून अधिक शेतकरी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

या योजनेमध्ये कमी उत्पादकता असलेले, कमी सिंचन क्षमता असलेले, कृषी कर्जाच्या उपलब्धतेबाबत समस्या असलेल्या १०० जिल्ह्यांची निवड केंद्र शासनाने केली आहे. यात महाराष्ट्र राज्यातील पालघर, रायगड, धुळे छत्रपती संभाजी नगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या नऊ जिल्ह्यांची निवड झालेली आहे.

सद्य:स्थितीमध्ये राज्यामध्ये केंद्र व राज्य शासनाद्वारे कार्यान्वित असलेल्या ३६ हून अधिक केंद्रीय आणि राज्य योजनांच्या अभिसरणाद्वारे पिकांची उत्पादकता वाढवणे, पिक उत्पादनाची शाश्वतता सुनिश्चित करणे तसेच काढणीपश्चात तंत्रज्ञान व पतपुरवठा प्रणाली मजबूत करण्याच्या उद्देशाने देशातील १०० आकांक्षित जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री धन- धान्य कृषी योजना, नैसर्गिक शेती व कडधान्य अभियान अंतर्गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीत शुभारंभ कार्यक्रम होणार असून राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालय, सर्व कृषी विज्ञान केंद्र, सर्व तालुका मुख्यालय, सर्व ग्रामपंचायत, सर्व प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्र, सर्व प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा पतसंस्था (झउड), सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्या या ठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

### राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविण्याचे आवाहन

यामध्ये लोकप्रतिनिधी, कृषी व संलग्न विभागातील अधिकारी/कर्मचारी, कृषी विद्यापीठे /कृषी विज्ञान केंद्रांचे शास्त्रज्ञ, कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी, पीक स्पर्धा विजेती शेतकरी, नैसर्गिक शेती करीत असलेले शेतकरी, शेतकरी गट/शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित रहावे. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण https://pmindiawebcast.nic.in या लिंकद्वारे करण्यात येणार आहे.

तरी राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

# शाळांमध्ये मराठी भाषा, राज्यगीत गायन अनिवार्य : मंत्री दादाजी भुसे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य शिक्षण मंडळासह अन्य सर्व मंडळांच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन अनिवार्य असून राज्यगीत गायन सुद्धा केले जावे, अशी सूचना शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केली.

राज्यातील सर्व शिक्षण मंडळाच्या समन्वयक, प्राचार्य आणि शिक्षण विभागाचे अधिकारी यांची सहविचार बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी शालेय शिक्षण मंत्री भुसे बोलत होते. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, शिक्षण आयुक्त सच्चिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन, मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक राजेश कंकाळ यांच्यासह सीबीएसई, आयसीएसई, इंटरनॅशनल बोर्डाचे विविध समन्वयक व शाळांचे प्राचार्य आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. शालेय शिक्षण मंत्री भुसे म्हणाले, आयसीएसई, सीबीएसई, केंब्रिज मंडळातील शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या दहावीच्या गुणपत्रिकेवरसुद्धा मराठी हा विषय आला पाहिजे. त्यासाठी विविध मंडळांशी पत्रव्यवहार केला जाईल. राज्य मंडळाप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यासंदर्भातील अभ्यासक्रमाचा आयसीएसई बोर्डाच्या पुस्तकामध्येही समावेश झाला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. इंटरनॅशनल बोर्ड मध्ये मानव्यविद्या या विषयांमध्ये महाराष्ट्राचा इतिहास शिकवण्याबाबतही विचार केला जावा. दिव्यांग विद्यार्थी, कमी अध्ययन क्षमता असणारे विद्यार्थी यांचाही सर्वसमावेशक शिक्षणात समावेश केला जावा. सीसीटीव्ही सर्व शाळांमध्ये बसवले जावेत. शिक्षण हक्क अधिनियमांतर्गत अन्य बोर्डाच्या शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या प्रवेशाची तसेच शालेय शिक्षण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची अन्य बोर्डाच्या शाळांमध्येही काटेकोर आणि प्रभावी अंमलबजावणी केली जावी. राष्ट्र प्रथम ही भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जावी. ‘एक पेड माँ के नाम’ या उपक्रमाची देखील प्रभावी अंमलबजावणी करावी. उत्तम सुविधा असणाऱ्या अन्य बोर्डाच्या शाळांनी मराठी माध्यमाच्या शाळांनाही मार्गदर्शन करावे, अशा सूचनाही मंत्री दादाजी भुसे यांनी यावेळी दिल्या.

### सर्व शिक्षण मंडळाच्या समन्वयक, प्राचार्य यांची सहविचार बैठक

विविध मंडळांच्या समन्वयक, प्राचार्य यांनी यावेळी त्यांच्या शाळांमध्ये सुरू असलेले विविध उपक्रम, अध्ययन आणि अध्यापनाचे प्रयोग, मूल्यमापन पद्धती या विषयी माहिती दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# महाबोधी महाविहार मुक्तीसाठी येत्या १४ ऑक्टोबर रोजी मुंबईत आझाद मैदानात सर्व आंबेडकरी बौद्ध जनतेचा विराट मोर्चा

## विविध पक्षाचे, रिपब्लिकन गटांच्या नेत्यांची उपस्थिती; बौद्ध आंबेडकरी जनतेने सहभागी होण्याचे केले आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे बौद्धांचे सर्वोच्च जागतिक श्रद्धास्थान आहे. महाकारुणिक तथागत भगवान बुद्धांना जिथे ज्ञानप्राप्ती झाली ते बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या आजही ताब्यात नाही. ज्या कर्मकांड पिंडदानाला अंधश्रद्धेला भगवान बुद्धांनी विरोध केला ते प्रकार महाबोधी महाविहार परिसरात होत असल्याने बौद्धांच्या भावना दुखावल्या जात आहेत.महाबोधी महाविहार



व्यवस्थापन ट्रस्ट मध्ये चार हिंदू चार बौद्ध आणि कलेक्टर चेअरमन असतात.महाबोधी महाविहार पूर्णतः बौद्धांच्या ताब्यात नाही.त्यामुळे महाबोधी महाविहार व्यवस्थापन कायदा १९४९ ज्याला बिटी ॲक्ट म्हटले जाते तो बी टी ॲक्ट रद्द झाला पाहिजे. भारताचे संविधान २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाले असून त्यापूर्वीचा १९४९ चा बिहार विधानसभेचा बिटी ॲक्ट रद्द झाला पाहिजे.महाबोधी महाविहार ट्रस्ट मधील सर्व ९ सदस्य आणि चेअरमन हे बौद्ध असले पाहिजेत. प्रत्येक धर्माचे धार्मिक स्थळ त्या त्या धर्माच्या ट्रस्ट कडे असतात. हिंदू मंदिरात हिंदू ट्रस्टी; मुस्लिमांच्या दर्गा मशीद मध्ये मुस्लिम ट्रस्टी; शिखांच्या गुरुद्वारात शीख ट्रस्टी मग बौद्धांचे बुद्धविहार बौद्धांच्या ताब्यात का नाही? बौद्धांच्या महाबोधी बुद्धविहार ट्रस्ट मध्ये बौद्ध ट्रस्टी का नको? महाबोधी महाविहार बौद्धांचे असून त्याचे व्यवस्थापन पूर्णपणे बौद्धांचे असले पाहिजे.महाबोधी महाविहार इतरांच्या ताब्यातून मुक्त करून बौद्धांच्या ताब्यात द्यावे.या मागणीसाठी महाराष्ट्रातील सर्व रिपब्लिकन गट सर्व बौद्ध आंबेडकरी संघटना; सर्व पक्षीय बौद्ध नेते एकत्र आले असुन येत्या १४ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे या मागणीसाठी आझाद मैदान मुंबई येथे शांततापूर्ण विराट रॅली आयोजित करण्यात आली आहे. या रॅलीत प्रचंड संख्येने सर्व बौद्ध आंबेडकरी जनतेने ताकदीने सहभागी व्हावे असे आवाहन महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या एकजुटीचे निमंत्रक रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले.

या पत्रकार परिषदेस महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी एकत्रित आलेले विविध पक्षांचे अनेक बौद्ध नेते ; विविध रिपब्लिकन गटांचे नेते उपस्थित होते.

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढे सरसावली फॅमिली प्लॅनिंग, सोलापूर शाखा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापुरात यंदाच्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील अनेक भागांत पूरपरिस्थिती निर्माण झाली. अनेकांचे संसार पाण्यात वाहून गेले तर काहींचे आश्रयस्थानच उद्धवस्त झाले. या कठीण काळात सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेने स्प्रिंट फोर ह्युमॅनिटेरियन प्रकल्पाच्या अंतर्गत शाखेने पुढाकार घेत पूरग्रस्त बाधितांना मदतीचा हात देण्याचे ठरविले आहे अशी माहिती फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी दिली.

या मोहिमेअंतर्गत सोलापुरातील नागरिक, विविध संस्था व सामाजिक घटकांना आवाहन करण्यात आले असून मदत स्वरूपात धान्य, कपडे, भांडी, शालेय साहित्य इत्यादी वस्तू गोळा करण्याचे कार्य जोमाने सुरू आहे. या उपक्रमाला शहरातील नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत असून, मोठ्या प्रमाणावर साहित्य संकलन होत आहे. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे युवा प्रतिनिधी, कार्यकारिणी सदस्य व पदाधिकाऱ्यांनी ही मोठ्या स्वरूपात मदत कार्यालयात जमा करत आहेत.

पुढे बोलताना डॉ. येळेगावकर म्हणाले की, या आपत्तीच्या काळात प्रत्येकाने समाजातील गरजूंना मदतीचा हात द्यावा, हीच खरी मानवतेची ओळख आहे, या साहित्यासह पूरग्रस्त भागांमध्ये फॅमिली प्लॅनिंग च्या वतीने आरोग्य तपासणी शिबिराच्या माध्यमातून आरोग्य सेवा व औषधोपचार केला जाणार आहे.

सोलापूर शाखेत जमा झालेले सर्व साहित्य पूरग्रस्त परिसरातील नागरिकांना स्वतः शाखेच्या माध्यमातून वाटप करण्यात येणार

**समाजभावनेतून धान्य, कपडे, शैक्षणिक साहित्य गोळा करण्यास उत्स्फूर्त प्रतिसाद**

असल्याचे माजी अध्यक्षा डॉ. नभा काकडे, सदस्या डॉ. विजया महाजन, डॉ. राजीव प्रधान व शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी सांगितले.

यावेळी चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवा प्रतिनिधी साक्षी सर्वगोड, कांचन पवार, अकाउंट ऑफिसर व्यंकटेश मच्छा, कल्पना गडगडे, अर्चना पारशेट्टी, हेमंत म्हेत्रे, जोडभावी पेठ नागरीआरोग्य केंद्राच्या अधीपरिचारिका लता गायकवाड, मार्केट यार्ड चे व्यापारी अशोक संकलेच्या व जगदीश भुताडा यांनी धान्य, भांडी व कपडे अशी मदत कार्यालयात जमा केली.

पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी योगदान देण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची असल्याचे मतही या वेळी व्यक्त करण्यात आले. आपत्तीच्या काळात एकमेकांना हात देणे हेच समाजाचे खरे बळ आहे, असा संदेश या उपक्रमातून सोलापुरकरांना देण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे स्वागत उर्मिला बनसोडे यांनी केले. प्रास्ताविक स्वप्नील सोनावणे यांनी केले. सूत्रसंचालन विकी शिवशरण यांनी केले तर आभार सत्यभामा कांबळे यांनी मानले.




# ऑटो रिक्षा टॅक्सी चालक मालक संघटना संयुक्त कृती समिती यांच्या वतीने उल्हासनगर रिक्षा बंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाळासाहेब अहिरे/उल्हासनगर : ऑटो रिक्षा टॅक्सी चालक मालक संघटना संयुक्त कृती समिती महाराष्ट्र प्रदेश रिक्षा आणि टॅक्सी चालक संघटना हक्कांसाठी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबा कांबळे महाराष्ट्र अध्यक्ष नरेंद्र गायकवाड . या संघटनेने राज्यातील रिक्षा, टॅक्सी आणि कॅब चालकांच्या मागण्यांसाठी राज्यव्यापी बंदची घोषणा केली होती, ज्यामध्ये विविध पदाधिकारी आणि संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

उल्हासनगर शहर रिपब्लिकन रिक्षाचालक मालक संघटना शहराध्यक्ष बहादूर करोतिया यांनी या बंदला समर्थन देऊन केले. ९ ऑक्टोबर २०२५ मध्ये राज्यव्यापी रिक्षा, टॅक्सी व कॅब बंद आंदोलन आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये ऑटो टॅक्सी ट्रान्सपोर्ट फेडरेशन व महाराष्ट्र रिक्षा पंचायत यांचेही सदस्य सहभागी होते.

संघटनेच्या प्रमुख मागण्या

१) राज्यातील मुक्त परवाना बंद झालेच पाहिजे.

२) इलेक्ट्रिक ऑटो रिक्षाला परवाना सक्ती करण्यात यावी.

३) टु विलर बाईक टॅक्सी बंद झालीच पाहिजे.

४) डॉ बाबा कांबळे साहेब यांची निवड करण्यात यावी आणि राज्यातील प्रत्येक ठढज कार्यालयात मध्ये स्थानिक चे २ प्रतिनिधी ची निवड करण्यात यावी.

५) उछत्र बाटला टेस्टिंग रेट पहिले ५००रु फी होती. आता ती २८०० आहे ती फी पूर्वी प्रमाणे ५०० रु घेण्यात यावी...

(६) ओला-उबेर दर राज्यात निश्चित झालेच पाहिजे.

७) राज्यातील अवैध प्रवासी वाहतूक (थहळींश पीीलशी श्रिरींश) असलेले बाहन जे शाळे ची वर्दी मारतात किंवा प्रवासी वाहतूक करतात त्यांना बंद करण्यात यावीत त्याचा कारण असा की अधिकृत प्रवासी करणाऱ्या वाहनांना प्रोफ शनल टॅक्स भरावा लागत आहे.

८) कल्याण स्टेशन परिसरात लागत असलेले अवैध पार्किंग त्वरित बंद करण्यात यावी व रस्ता मोकळा करण्यात यावा.

९) कल्याण पश्चिम रेल्वे स्थानका जवळ कायमस्वरूपी एक अधिकारी सह एक वाहन लायसन्स बॅच व कागदपत्र तपासणी करण्याकरिता उपप्रादेशिक परिवहन कार्यालय कडून ठेवण्यात यावी जेणेकरून अवैध वाहतूक करणारे स्टेशन परिसर मोकळा करतील.

१०) उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहन स्क्रैप करण्या करिता दलाला मार्फत जो भोंगळ कारभार सुरू आहे तो ताबडतोब बंद करण्यात यावा व पूर्वी झालेल्या बैठकीत जसा ठरला होता त्या पद्धतीनेच वाहन स्क्रैप करण्यात यावे. हे सर्व मुद्दे आम्ही ऑटो रिक्षा टॅक्सी चालक-मालक संघटना संयुक्त कृती समिती महाराष्ट्र प्रदेश च्या वतीने या एक दिवसीय आंदोलन करण्यात आले होते.

# समतानगर येथे वर्षावास समाप्ती व कोजागिरी पौर्णिमा कार्यक्रम उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : समाज प्रबोधन व्हावे, धम्म चळवळ अधिक गतिमान होण्यासाठी पौर्णिमा मित्र मंडळ, पडघा यांच्या वतीने भिवंडी तालुक्यातील समतानगर येथिल विनोद जाधव, उज्वला जाधव यांच्या निवासस्थानी वर्षवास समाप्ती व कोजागिरी पौर्णिमा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालिभाषा अभ्यासक सुभाष जाधव होते. यावेळी शिक्षक रमेश वंजारे, भारतीय बौद्ध महासभा ठाणे जिल्हा अध्यक्ष रमेश जाधव,भारतीय बौद्ध महासभा भिवंडी तालुका सचिव विद्या सोनावणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.वर्षावास ही बुद्धकाळापासून चालत आलेली परंपरा आहे. जगात गुरुपौर्णिमा अर्थात आषाढी पौर्णिमा ,आनंद उत्सव म्हणून साजरा केला जातो. भगवान बुद्धांनी समस्त मानवाला अविद्येच्या अज्ञान अंधकारातून मुक्त करणारे आणि प्रज्ञेच्या प्रकाशामध्ये आणणारे ज्ञान पेरले. याच दिवसापासून बुद्ध धम्मातील पवित्र तीन महिन्यांच्या वर्षावासाला सुरवात होते. त्याचं अनुषंगाने कार्यक्रमाचे आयोजन जाधव परिवाराच्या निवासस्थानी करण्यात आले होते. यावेळी दृष्टी जाधव, हर्षित जाधव यांच्या हस्ते बुद्ध वंदनेच्या पुस्तकांचे वाटप उपस्थित उपासिका ,उपासकांना करण्यात आले.तर विनोद जाधव, उज्वला जाधव यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तर पौर्णिमा मित्र मंडळ ,पडघे यांच्या वतीने पडघा विभागात दर महिन्यात विविध घरोघरी पौर्णिमा साजरी करण्यात येणार आहे.

**अल्पमुदतीच्या अभ्यासक्रम सोहळ्याचे केले आभासी पद्धतीने केले उद्घाटन**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन**

# तरुणाईच्या उर्जेला वाव देण्यासाठी म.बसवेश्वरसह महाराष्ट्रातील सर्व आयटीआयमध्ये अल्पमुदतीचे आधुनिक अभ्यासक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


सोलापूर (जिमाका) : वाढती लोकसंख्या आणि त्याबरोबरच तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगार देण्याचे आव्हान पेलण्यासाठी सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये असलेल्या पायाभूत सुविधांचा पुरेपूर वापर करून अल्पमुदतीचे व्यवसाय अभ्यासक्रम अंगीकारणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी केले. ते राज्यातील विविध औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून (आयटीआय) नव्याने सुरू होणाऱ्या अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.

सदर सोहळ्याचे आभासी पद्धतीने उद्घाटन मुंबईहून माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी केले. त्यावेळेस बोलताना त्यांनी तरुणांमधील शिकण्याची उर्मी आणि वाढत्या औद्योगीकरणाची गरज यांचा ताळमेळ बसवण्यासाठी अल्पमुदतीचा अभ्यासक्रम हा एकमेव पर्याय असल्याचे सांगितले.

अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातून केवळ रोजगार व शिक्षण हाच हेतू नसून आपण यापूर्वी घेतलेल्या शिक्षण व प्रशिक्षणाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन स्वतःला सदैव काळाच्या पुढे ठेवण्याचेही ते माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले.

एक रोजगारक्षम युवक हा समृद्धी आणि सामाजिक चेतनेचे वलय घेऊन समाजामध्ये वावरत असतो , आणि या तरुणाईच्या उर्जेला साथ देण्यासाठी शासन व प्रशासन एक दिलाने काम करत असून त्यांच्या प्रयत्नांचे मूर्त स्वरूप म्हणजेच हे नव्याने सुरू होणारे आधुनिक तंत्रज्ञानाशी निगडित असे अल्पमुदतीचे व्यवसाय आहेत, याचा तरुणांनी पुरेपूर लाभ घ्यावा, असे आवाहन पंतप्रधानांनी केले.

सोलापूर येथील विजापूर रोडवरील महात्मा बसवेश्वर शासकीय



औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत या विशेष प्रसंगी शासनाच्या विश्वकर्मा योजनेचे लाभार्थी सुवर्णकार श्री सिद्धराम पोतदार यांच्या हस्ते येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सदरच्या अभ्यास वर्गाचे फीत कापून रीतसर औपचारिकपणे उद्घाटन झाले.

श्री.सिद्धाराम पोतदार यांनी उपस्थितांना चौकसपणे शासकीय योजनांचा लाभ घेऊन समाजात आत्म विश्वासाने पुढे येण्याचे आवाहन केले. श्री.एस. एस. नंदी हे अध्यक्षस्थानी होते.

प्रत्यक्ष उद्घाटनाच्या या कार्यक्रमात संस्थेचे प्राचार्य श्री. सुरेश भालचिम यांनी भूषविले. त्याप्रसंगी उपस्थितितांना मार्गदर्शन करताना त्यांनी सध्या रोजी १) टू व्हीलर सर्विस असिस्टंट, २) सी. एन.सी. ऑपरेटर व्ही.एम.सी. व ३) सोलर पी व्ही इन्स्टॉलर- इलेक्ट्रिकल असे तीन व्यवसाय पहिल्या टप्प्यात सुरू करण्यात आले असून , आगामी काळात त्यामध्ये आणखी भर पडून एकूण बारा व्यवसाय अभ्यासक्रम सुरू होणार असल्याचे सांगितले .

अत्यल्प प्रशिक्षण शुल्क आकारून सुरू झालेल्या या व्यवसाय अभ्यासक्रमामध्ये आधुनिक यंत्र सामग्री, कुशल व अनुभवी प्रशिक्षक वर्ग यांच्या मदतीने दर्जेदार प्रशिक्षण दिले जाणार असल्याने त्याचा जास्तीत जास्त युवकांनी लाभ घ्यावा असे त्यांनी उपस्थितांना आवाहन केले.

याप्रसंगी संस्था व्यवस्थापन समिती सदस्य दशरथ वडतिले उपस्थित होते. त्यांनीही उपस्थित तरुणांना मार्गदर्शन करताना अल्पावधीमध्ये राष्ट्राच्या उन्नतीसाठी जास्तीत जास्त युवक , युवतींनी हे तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण घेतले पाहिजे यावर भर दिला.

कार्यक्रमास जिल्हा कौशल्य रोजगार मार्गदर्शन अधिकारी श्री. हनुमंत नलावडे, किर्लोस्कर उद्योग समूहाच्या श्रीमती सायली मंत्री , थरमॅक्स इंजिनिअरिंग सोलापूरचे व्यवस्थापक श्री. किरण भिसे, अल्ट्राटेक सिमेंटचे एच. आर. मॅनेजर श्री. एस एस नंदी, स्वदर्श इंजिनिअरिंगचे व्यवस्थापक श्री. शंकर शिंदे, याचबरोबर संस्थेतील वरिष्ठ गटनिदेशक श्री. सिद्राम गोलेकर, श्रीमती स्मिता शिंदे, श्रीमती निर्मला म्हेत्रे, श्री.अशोक मिरगणे, कार्यालयीन अधीक्षक श्री. प्रदीप दराडे ,श्री. बालाजी माळी यांसह संस्थेतील निदेशक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री बाबू आसरेडी व श्रीमती कांचन कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य श्री सूर्यकांत झणझणे यांनी केले , तर श्री. विजय भांगे यांनी आभार मानले. सदरच्या कार्यक्रमास प्रवेश इच्छुक प्रशिक्षणार्थी, निवृत्त शासकीय अधिकारी , कर्मचारी , तसेच शासनाच्या विविध योजनांचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य पदांचे आरक्षण सोडत

## ठिकठिकाणी विशेष सभेचे आयोजन; नायब तहसीलदार यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका)-: महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम, २०२५ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात सभा घेऊन अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती/नागरिकांचा मागास प्रवर्ग व त्यामधील स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करावयाच्या आहेत.

त्याकरीता सोडत पध्दतीने कार्यवाही करण्याकरीता खाली दर्शविल्याप्रमाणे विशेष सभा आयोजित केली आहे.

जिल्हा परिषद सोलापूर- सभेचे ठिकाण नियोजन भवन सभागृह सात रस्ता सोलापूर

पंचायत समिती उत्तर सोलापूर -सभेचे ठिकाण- बहुउद्देशीय सभागृह जुने जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर.

पंचायत समिती दक्षिण सोलापूर- सभेचे ठिकाण- रंगभवन सभागृह सोलापूर.

पंचायत समिती अक्कलकोट- सभेचे ठिकाण तहसील कार्यालय अक्कलकोट.

पंचायत समिती मंगळवेढा सभेचे ठिकाण तहसील कार्यालय मंगळवेढा.

पंचायत समिती पंढरपुर .सभेचे ठिकाण- पंचायत समिती सभागृह पंढरपूर

पंचायत समिती मोहोळ- सभेचे ठिकाण- पंचायत समिती मोहोळ.

पंचायत समिती बार्शी- सभेचे ठिकाण- पंचायत समिती सभागृह बार्शी.

पंचायत समिती करमाळा -सभेचे ठिकाण- पंचायत समिती सभागृह करमाळा.

पंचायत समिती माळशिरस -सभेचे ठिकाण- पंचायत समिती सभागृह माळशिरस.

पंचायत समिती माढा -सभेचे ठिकाण- जगदाळे मंगल कार्यालय वैराग रोड माढा.

पंचायत समिती सांगोला -सभेचे ठिकाण- पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृती भवन सांगोला.

वरील सर्व सभा सोमवार दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता या एकाच वेळी होणार आहेत.

तरी जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीतील ज्या रहिवाशांची सदर सभेस हजर राहण्याची इच्छा आहे, त्यांनी वरील ठिकाणी व वेळी हजर रहावे. अशी माहिती नायब तहसीलदार, सर्वसाधारण जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांच्याकडून मिळाली आहे.

# हरियाणाचे दलित आयपीएस अधिकारी वाय पुरणकुमार यांच्या आत्महत्येची सखोल चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : हरियाणाचे दलित आयपीएस अधिकारी वाय पुरणकुमार यांनी आत्महत्येची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केली आहे.

हरियाणाचे दलित आयपीएस अधिकारी वाय पुरणकुमार हे राष्ट्रपती पदक विजेते आयपीएस अधिकारी होते. त्यांची कामगिरी चांगली होती.अनेक ठिकाणी दलित अधिकाऱ्यांना जातीवादतून टार्गेट करून त्यांच्यावर अन्याय केला जातो.त्यांचा मानसिक छळ होतो. दलित अधिकाऱ्यांवर दबाव आणून कामाचा ताण वाढविला जातो..असे अनेक प्रकार घडतात.

दलित अधिकाऱ्यांच्या छळ केला जातो.त्यामुळे जातीभेदाच्या मानसीकतेतुन दलित अधिकाऱ्यांवर अन्याय होता.त्यामुळे हरियाणाचे दलित आयपीएस अधिकारी वाय पुरणकुमार यांच्या आत्महत्येची सखोल चौकशी झाली पाहिजे. त्यांच्या आत्महत्येचे काय कारण आहे ते शोधुन काढले पाहिजे. त्यांच्या आत्महत्येस जे जबाबदार असतील त्यांच्या वर कठोर कारवाई झाली पाहिजे. एट्रोसिटी एक्ट नुसार कारवाई झाली पाहिजे अशी मागणी केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केली आहे. आय पी एस अधिकारी पुरण कुमार दलित समुदायातुन आलेले राष्ट्रपती पदक विजेते उत्कृष्ठ अधिकारी होते.त्यांच्यावर अशी आत्महत्येची वेळ येणे ही चिंताजनक दुःखद बाब आहे. वाय पुरण कुमार यांच्या आत्महत्येची सखोल चौकशी केली पाहिजे. दोंषीवर कठोर कारवाई झाली पाहिजे.या प्रकरणी आपण हरियाणाचे मुख्यमंत्री साहेब सिंह सैनी यांच्याशी या प्रकरणी बोलणार आहोत.मयत अधिकारी वाय पुरणकुमार यांना आपन न्याय मिळवून देणार आहोत.असे ना.रामदास आठवले म्हणाले.

# भैरवनाथ शुगर उद्योग समूहाच्या चेअरमनपदी अनिल सावंत तर व्हाईस चेअरमनपदी विक्रम सावंत यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्रातील नावाजलेल्या उद्योग समूहाच्या एक असलेल्या भैरवनाथ शुगर उद्योग समूहाच्या चेअरमन पटीत अनिल सावंत यांची एक मताने निवड करण्यात आली आहे मोबाईल चेअरमनपदी विक्रांत सावंत यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या ह्या निवडीमुळे नवचैतन्य लाभणार असल्याचे अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

भैरवनाथ उद्योग समूहाची स्थापना माझी आरोग्य मंत्री आमदार तानाजी सावंत. प्राध्यापक शिवाजी सावंत यांनी केली आहे. त्यांच्या दोन गोष्टीमुळे उद्योग समूह केवळ साखर उत्पादनपुरता मर्यादित न राहता विविध क्षेत्रांमध्ये ठसा उमटवणारा हा औद्योगिक समूह म्हणून उद्या साला आहे. या समूहामध्ये पाच साखर कारखान्यासह अनेक उद्योग समूहापासून हजारो शेतकरी व कामगार यांच्या जीवनात स्थरी आणण्याचे काम मोलाचे करीत आहेत. नूतन चेअरमन अनिल सावंत हे उद्योग समूहाची प्रगती अधिक वेगाने होईल. अशी आशा समूहातील कर्मचारी व हितचिंतकाने व्यक्त केली आहे. भविष्यात औद्योगिक धोरणे व शाश्वत विकासाच्या दृष्टीने हे नेतृत्व महत्त्वाचे ठरणार आहे. उद्योग कर्तुत्वात त्यांच्या नेतृत्वाचे पंढरपूर मंगळवेढ्याच्या वतीने सर्व सरातून त्यांचे स्वागत व कौतुक होत आहे.

# कृषी विभागाची जिल्हास्तरीय निविष्ठा विक्रेत्यांची रब्बी हंगाम पूर्व कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : रोजी बी जे.हायस्कूल सभागृह येथे जिल्हास्तरीय निविष्ठा विक्रेत्यांची रब्बी हंगाम पूर्व कार्यशाळा घेण्यात आली.



कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी शेतकरी मित्र समजून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे व दर्जेदार कृषी निविष्ठा शेतकर्यांना उपलब्ध करून द्याव्यात, तसेच अनुदानित खत विक्री करताना पॉस मशीनचाच वापर करावा.मशीन शिवाय विक्री करणे गुन्हा आहे. सर्व बियाणे साथी पोर्टल द्वारेच विक्री करावे. असे यावेळी ठाणे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, ठाणे रामेश्वर पाचे यांनी बोलतांना सांगितले. तसेच कृषी निविष्ठा विक्रेत्यांना साथी पोर्टल विषयी सविस्तर मार्गदर्शन मा.रवींद्र पाचपुते, तंत्र अधिकारी तथा समन्वय अधिकारी ,कृषी आयुक्तालय पुणे यांनी केले.यावेळी ,कृषी विकास अधिकारी एम. एम .बाचोटीकर जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक ठाणे, बालाजी शिंदे , मोहिम अधिकारी जि.प. ठाणे महेश बनकर ,जिल्हा मृदासर्वेक्षण अधिकारी ठाणे , रूपाली काळे, जिल्हाध्यक्ष कृषी निविष्ठा विक्रेते संघटना ठाणे, समीर ठाकरे ,तालुका गुण नियंत्रण निरीक्षक भगवान पथारे, विवेक दोंदे इ. वक्त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. सूर्यकांत कांबळे, राम चंद्र घुडे, शिंदे असे तालुका गुणनियंत्रण निरीक्षक सोबतच जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्रेते हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेची प्रस्तावना व सूत्रसंचालन बि.डी जावीर कृषी अधिकारी यांनी केले तर विवेक दोंदे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# नाभिक बांधवांच्या वतीने निफाड येथे जीवाजी महाले यांची जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथे पिंपळगाव बसवंत रोड लगत असलेल्या नियोजितश्री विठ्ठल रुक्मिणी, संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज, व संत सेना महाराज मंदिराच्या सभा मंडपात छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रमी सहकारी व शूरवीर जीवाजी महाले यांची जयंती नाभिक बांधवांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली

श्री संत सेना फाउंडेशन यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, फाउंडेशनचे अध्यक्ष ऍड शरद वाघ ,उपाध्यक्ष किशोर बिडवे, सचिव विशाल कणसे ,आदी मान्यवरांच्या उपस्थितीत नारायन सूर्यवंशी व बाळासाहेब बोरसे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व जीवाजी महाले यांच्या प्रतिमांची पूजन करून अभिवादन करण्यात आले ,




यावेळी किशोर बिडवे ,रवी गायकवाड ,मयूर सोनवणे, ऍड शरद वाघ ,यांनी छत्रपती शिवाजी महाराज व संत शिरोमणी जिवाजी महाले यांच्या कार्याचा आढावा घेतला, तसेच फाउंडेशनच्या सुरू असलेल्या आगामी कार्याची उपस्थितांना माहिती दिली, संजय आहेर, सोमनाथ सोनवणे, संजय शिंदे ,सुभाष दळवी, ज्ञानेश्वर गायकवाड ,सितराम गायकवाड, रवींद्र गायकवाड ,राकेश सोनवणे, सतीश जगताप, गणेश मगर ,विशाल पवार, प्रमोद सोनवणे, सुनील आहेर ,नवनाथ वाघ ,राजू सोनवणे ,गोकुळ सूर्यवंशी ,नितीन भराडे, राजेंद्र मगर ,किरण मगर, कुलदीप पवार, आदीसह नाभिक समाज बांधव मोठ्या नाभिक समाज संघटनेचे संख्येने उपस्थित होता

# अनिता कांबळे 'महाराष्ट्र गौरव पुरस्कारा'ने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन, मुंबई व सहकर्म सामाजिक कल्याण फॉउंडेशन (रजि.) ही संस्था गेली अनेक वर्षे महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'महाराष्ट्र गौरव पुरस्कारांनी' सन्मानित करते. २०२५ मधील शैक्षणिक क्षेत्रातील अतुलनीय कार्यासाठी अनिता दिलीपकुमार कांबळे यांना राज्यस्तरीय आदर्श




शिक्षिका पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.हा पुरस्कार वितरण सोहळा रविवार दिनांक -५ऑक्टोबर २०२५ रोजी अग्रवाल महाविद्यालय, कल्याण येथे पार पडला. अनिता कांबळे ह्या भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खडवली, ता. कल्याण याठिकाणी गेली २० वर्षे अध्यापनाचे कार्य करतात. यापूर्वी त्यांना 'पिंपळपान' या काव्यसंग्रहासाठी अनेक राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहेत. भारतीय विचारवंत आणि संतांचे सामाजिक कार्य याविषयावर ते व्याख्याने देत असतात. हा पुरस्कार मिळाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### रस्त्यावरील खड्ड्यांवरून शिवसेना आक्रमक

### आंदोलनामुळे वाहतूक खोळंबली

# निफाडला तहसील कचेरीसमोर खड्ड्यात स्ट्रेचरवर झोपून युवा सैनिकांनी केले रास्ता रोको आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी :

नाशिक छत्रपती संभाजी नगर महामार्गावरती पिंपळस ते विंचूर दरम्यान प्रचंड प्रमाणात खड्डे पडले आहेत यावर कुठलीही दखल घेतली जात नसल्याने आक्रमक पवित्रा घेत आज अखेर शिवसेना युवा सेनेने जिल्हाप्रमुख विक्रम रंधवे यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी निफाड तहसील कचेरी समोरील खड्ड्यात रुग्णवाहिकेतील स्ट्रेचर ठेवून त्यावर विक्रम रंधवे हे झोपून जवळपास दोन तास नाशिक छत्रपती संभाजीनगर महामार्ग रोखून धरला यावेळी या महामार्गावरती दोन ते अडीच किलोमीटर वाहनाच्या लांब लांब लागल्या होत्या त्यामुळे सायंकाळी घराकडे परतणारे प्रवाशांना याचा मनस्ताप सहन करावा लागला.




नाशिक छत्रपती संभाजी नगर महामार्गावरती प्रचंड प्रमाणात खड्डे पडलेले असल्याने या संदर्भात वारंवार सार्वजनिक बांधकाम खात्याला खड्डे बुजवण्यासंदर्भात अल्टिमेट देण्यात आला होता परंतु सार्वजनिक बांधकाम खाते कुठल्याही प्रकारची दखल घेत नसल्याने आज ढोल ताशाच्या गजरात निफाड येथील नाशिक छत्रपती संभाजी नगर महामार्गावर दोन तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आला यावेळी युवा सेनेचे जिल्हाप्रमुख विक्रम रंधवे यांनी तहसील कचेरी समोर पडलेल्या खड्ड्यांमध्ये स्ट्रेचर वर झोपत जोपर्यंत सार्वजनिक बांधकाम खाते खड्डे बुजवत नाही तोपर्यंत याच खड्ड्यात स्ट्रेचरवर झोपण्याचा निर्धार की व्यक्त केला मोठ्या प्रमाणात ट्राफिक जाम होऊन देखील बांधकाम खात्याचे कर्मचारी येत नव्हते अशा वेळेला निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दूरध्वनी द्वारे या आंदोलनाची जाणीव करून दिली तरी हे अधिकारी येत नसल्याने यावेळी युवा सैनिक आणि शिवसैनिक संतप्त झाले होते दोन तासानंतर बांधकाम खात्याचे मोहिते आल्यानंतर दिवाळीपर्यंत पिंपळस ते विंचूर दरम्यान चे खड्डे बुजवण्याचे आश्वासन दिले त्यावेळी सदरच्या आंदोलन मागे घेण्यात आले यावेळी शिवसेनेचे संजय कुंदे, ललित गीते , अनिल बीवाल, शिवा सुराशे ,निवृत्ती जगताप , बापूसाहेब कुंदे ,अरुण डांगळे, नीरज चोरडिया, विजय धारराव , कैलास धरराव, तुषार गांगुर्डे , सुयोग गायकवाड, अमोल वडघुले ,किरण वाघ, सुहास सुरळीकर ,सचिन खडताळे यांच्यासह शिवसैनिक युवासैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# निफाड पोलिसांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक पाटील यांच्या हस्ते सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : ऊन, वारा, पाऊस, सणवार यांची तमा न बाळगता रात्रंदिवस आपले कर्तव्य बजावत समाजात शांतता निर्माण करण्यासाठी, कायद्याचे पालन करत गुन्हेगारांचे कंबरडे मोडणारे निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस बांधव यांचे उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन नाशिक ग्रामीणचे जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील तसेच अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर तसेच पोलीस निरीक्षक गणेश गुरव , पोलीस अमंलदार धनंजय जाधव, नितीन सांगळे ,राजेंद्र दरोडे, अनिल शेरेकर, कपाळेश्वर ढिकले,विनोद जाधव, भास्कर पवार, सागर सानप या पोलीस बांधवांचा नाशिक येथे प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली निफाड पोलीस स्टेशन हद्दीतील पिंपळस येथील




चोरी, घरफोडीचे आरोपी २४ तासात पकडून त्यांचे कडून सोन्याचे दागिने सह मुद्देमाल हस्तगत करत इतरही जिल्ह्यातील या घटनेमुळे घरफोड्या उघडकीस आणल्या असून निफाड बस स्टैंड वर चोरी करण्यासाठी आलेल्या महिलांना चाणाक्ष नजरेनेहेरून त्यांना जेरबंद केले ,शहर व ग्रामीण मधील सात गुन्हे उघडकीस आणल्याने पुढील मोठे अनर्थ टळले ,निफाड पोलीस बांधवांच्या या कार्य तत्परतेने या गुन्हेगारांना पकडण्यात यश आल्याने त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल वरिष्ठांनी त्यांचा हा गौरव केला असून पुढेही त्यांच्या हातून असेच चांगले कार्य घडावे यासाठी पाठीवर शाब्बासकीची थाप दिली आहे, त्यांच्या या सन्मानाबद्दल निफाड पोलीस स्टेशनचे पदाधिकारी , पोलीस,तसेच निफाड करांच्या वतीने अभिनंदन केले जात आहे,